महाराष्ट्र शासन

# मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र,

द्वारा आद्योगिक प्रशिक्षण संस्था, त्र्यंबक रोड, सातपूर, नाशिक

☎ Phone No ( 0253 ) 2363494/2991586

Email Id -btri18@yahoo.com / btri.nashik@dvet.govt.in

क्र.मुप्रतअसूकेंना/MAPS/२०२३/१०८ दिनांक२७/०३/२०२३

प्रति,
मा. व्यवस्थापक,
शिकाऊ उमेदवारी सर्व नोंदणीकृत आस्थापना
सातपूर, अंबड आणि नाशिक जिल्हा.

विषयः- महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास परिक्षा मंडळाचे अभ्यासक्रम शिकाऊ उमेदवारी योजनेअंतर्गतम समाविष्ट असल्याबाबत.

संदर्भः- १. कौशल्य विकास एवं उद्यमशीलता मंत्रालय नवी दिल्ली यांचे दि.८ सप्टेंबर २०१७ राजपत्र
२.संचालनालय मुंबई यांचे पत्र क्र.१०/एटीएस/२०१९/प्र.क्र.०२/०६,दि.१५/०१/२०१९
३.संचालनालय मुंबई यांचे पत्र क्र.१०/एटीएस/२०१९/प्र.क्र.०२/१०,दि.१७/०१/२०१९
४.कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभाग मंत्रालय,मुंबई यांचे दि.०२ ऑगष्ट २०२२ चा शासन निर्णय

उपरोक्त विषयाच्या संदर्भात आपणास कळविण्यात येते की,भारत सरकार द्वारा दिनांक ७ सप्टेंबर २०१७ अन्वये निर्गमि शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळाच्या अभ्यासक्रमांना अधिनियम १९६१ अंतर्गत शिकाऊ उमेदवारी योजना लागू करण्यात आलेली असल्याने राजपत्र या www.apprenticeshipindia.org वेब साईटवर प्रसिध्द झालेले आहे.

यापुर्वी आपणास या कार्यालयाचे पत्र क्र.मुप्रतअसूकेंना/प्रशिक्षण/२०१९/५७ दि.०१/०२/२०१९ चे पत्रान्वये आपणास कळविण्यात आलेले होते.

राजपत्रानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी व संदर्भ क्र.०२ व ०३ अन्वये महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळाच्या अभ्यासक्रम पुर्ण करणा-या प्रशिक्षणार्थ्यांना शिकाऊ उमेदवारी देतांना खालील सुचनांप्रमाणे कार्यवाही करावी.

१. अभ्यासक्रम पूर्ण करणा-या प्रशिक्षणार्थ्यांनी पोर्टलवर रजिष्ट्रेशन करणे बंधनकारक आहे सदर व्यवसाय www.apprenticeshipindia.org या पोर्टलवर अपलोड करण्यात आलेले आहेत.
२. रजिष्ट्रेशन करतांना प्रशिक्षणार्थ्यांनी Candidate Type मध्ये MSBSVET हा पर्याय निवडून प्रशिक्षणार्थ्यांची माहिती भरणे आवश्यक आहे.
३. MSBSVET अंतर्गत अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण पुर्ण करुन प्रमाणपत्र धारक प्रशिक्षणार्थ्यांना संदर्भ क्र.०४ अन्वये ५% जागा शिकाऊ उमेदवारांसाठी आरक्षित ठेवण्यात याव्यात.
४. अनु. ०२ प्रमाणे फ्रेशर व कौशल्य प्रमाणपत्र धारक नोंदणी करणा-या प्रशिक्षणार्थ्यांला DGET चे पत्र क्र. MSDE 18013/06/ATS/EXA/2018-TTC, date 26/09/2018 अन्वये परिक्षेसाठी फ्रेशर प्रशिक्षणार्थ्यांप्रमाणे चार ही विषयाची परिक्षा देणे बंधनकारक आहे.

(जे. जे. पाटील)
सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार,
मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र
द्वारा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नाशिक

प्रतः- १.मा.सहसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,नाशिक यांना माहितीसाठी सविनय सादर.
२. प्राचार्य,स्वामी विवेकानंद व्यवसाय प्रशिक्षण केंद्र मानूर ता.कळवण जि.नाशिक यांना माहितीसाठी.